# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थपित राज्य विद्यापीठ)

*(आस्थापना विभाग)*

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५९२

क्र. गो.वि/आस्था/१०५०/२०१५ दि. : २३/०६/२०१५

प्रति,

मा. प्राचार्य/संलग्नीत महाविद्यालय
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

**विषय** :– डॉ. निलम गो–हे, वि.प.स.यांनी विधान परिषदेमध्ये विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित केलेल्या सुचनेबाबत.

**संदर्भ**:–१. उशिस–२०१५ महिला तक्रार/प्रशा–१/५४१८ दि, ५ जुन २०१५.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणास पुनश्च: कळविण्यात येते की, विशाखा जजमेंट व महिलांचे लैंगिक छळापासून सरक्षण (प्रतिबंध मनाई निवारण)अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार महिला तक्रार निवारण समितीचे गठन करण्यात यावे व संदर्भिय पत्रानुसार प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थितीची सत्यता पडताळून त्याचा अहवाल यथाशिघ्र विद्यापीठास सादर करण्यात यावे. तसेच संचालनालयाचे पत्र विद्यापीठाच्या www.unigug.org वेबसाइड वर दिलेले आहे. आपणाकडून प्राप्त झालेला अहवाल संचालनालयास तात्काळ सादर करणे गरजेचे आहे. अहवाल प्राप्त न झाल्यास पुढील होणा–या कार्यवाहीस महाविदयालय जबाबदार राहील.याची नोंद घ्यावी.

डॉ. विनायक इरपाते
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र:–
१.शिक्षण संचालनालयाकडून प्राप्त झालेले पत्र.

प्रत:- उपकुलसचिव(प्रशासन), आस्थापना विभाग. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे अहवाल सादर करण्यात यावे.

~~ई/विजया/पतनिस/~~

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१**
Web : www.dirhe.org E-mail : dhepune@yahoo.co.in
(०२०) २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्रमांक उशिस-२०१५ महिला तक्रार/प्रशा-१ / ५५१८ दिनांक 5 JUN 2015

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण,
सर्व कुलसचिव अकृषी विद्यापीठे

आवक 1308 17/6/15

विषय-डॉ.निलम गो-हे,वि.प.स.यांनी विधान परिषदेमध्ये विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित केलेल्या सूचनेबाबत.

संदर्भ-विउले-२०१५/(२९४/१५)/विशि-१ दिनांक ५.मे २०१५

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन पत्रासोबत जोडलेले महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय यांचे दिनांक १६.०४.२०१५ मध्ये विधान परिषद सदस्य डॉ.निलम गो-हे यांनी विधान परिषदेत पुण्यासह राज्यातील शैक्षणिक काम करणा-या महिलांवर होणा-या अत्याचा-यांच्या तक्रारीचे निराकरण करण्याकरीता विशाखा समित्या स्थापन करण्यात आल्या असून त्यांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता याबाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडलेली आहे.

प्रस्तुत सूचनेत त्यांनी कामाच्या ठिकाणी असलेल्या महिला कर्मचारी यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने,पुण्यासह राज्यातील शैक्षणिक काम करणा-या महिलावर होणा-या अत्याचारांच्या तक्रारींचे निराकरण करण्याकरीता विशाखा समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत,परंतु त्या समित्या फक्त कागदोपत्री असून संस्थाचालक,प्राचार्य,विविध संघटना ,विविध हित संबधित गट यांच्या दबावामुळे तक्रारच नोंदवून घेतली जात नाही.असे दैनिक लोकसत्ता व पुण्यातील अनेक वृत्तपत्रांनी याबद्दल पाहणी केली असल्याचे नमुद केलेले आहे,तसेच तक्रार नोंदवायला गेलेल्या महिलांनाच धमकी दिली जाते असेही नमुद केलेले आहे.तसेच काही महाविद्यालयामध्ये तक्रार निवारण समितीमध्ये अध्यक्ष हे पुरुष असल्याचे नमुद केलेले आहे.

तरी उपरोक्त वस्तुस्थिती पाहता आपणास पुनश्च: कळविण्यात येते आपल्या अधिनस्त सर्व अनुदानित महाविद्यालये / विद्यापीठे /शासकीय संस्था /महाविद्यालये यामध्ये विशाखा जजमेंट व महिलांचे लैंगिक छळापासून सरंक्षण(प्रतिबंध मनाई निवारण)अधिनियम २०१३ मधील तरतुदीनूसार महिलातक्रार निवारण समित्यांचे योग्य प्रकारे गठण करण्यात यावे.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 804 दि. 17/6/15
3067 दि. 17/6/15

**अ) सदर समितीमध्ये अध्यक्षा ही महिला असावी.**

**ब) यासमितीमध्ये ५० टक्के सदस्य महिला असाव्यात.**

mhilatakar niwarn samiti12-13

क) एक अशासकीय सदस्य महिला असावी.(अशासकीय सदस्य नसलेली समिती अधिकृत समजण्यात येणार नाही व त्यासमितीने केलेली चौकशीही ग्राहय धरली जाणार नाही )

तसेच प्रत्येक कार्यालयाने गठित केलेल्या महिला तक्रार निवारण समितीची प्रत माहीती फलकावर लावण्यात यावी,जेणेकरुन तक्रारदार व्यक्तींना तक्रार कोणाकडे करावी याबाबतची माहीती मिळेल.

*** सदर महिला तक्रार निवारण समितीचे कामकाज पुढीलप्रमाणे चालेल.***

१. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महिलांच्या लैंगिक छळवणुकीस आळा घालण्यासाठी व कामाच्या ठिकाणी सुरक्षीत वातावरण मिळावे यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

२. कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण निर्धारित कालावधीमध्ये छाणनी करणे व तक्रारींच्या अनुषंगाने योग्य त्या प्राधिक-यांकडे पुढील प्रस्ताव सादर करणे.

३.लैंगिक छळवणूकीसारखे प्रकार टाळण्यासाठी कालबध्द कार्यक्रम घेणे तसेच समितीच्या नियतकालीक बैठकीत त्याबाबत वेळेवेळी आढवा घेणे.

डॉ.निलम गो-हे,वि.प.स.यांनी विधान परिषदेमध्ये विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की ,यापूर्वी आपल्या कार्यालयाकडून आपल्या विद्यापीठात /आपल्या विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या कार्यकक्षेतील शासकीय व अनुदानित संस्था/महाविद्यालये यामध्ये अशा प्रकरच्या समित्या गठण केलेल्या असून त्या कार्यान्वीत असल्याबाबत संचालनालयास कळविण्यात आलेले आहे, उपरोक्त प्रस्तुत मुद्या पाहता, प्रथम प्राधान्याने प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थितीची सत्यता पडताळून वस्तुनिष्ठ अहवाल संचालनालयास ७ दिवसात सादर करण्यात यावा,जेणेकरून प्रस्तुत प्रकरणातील सविस्तर अहवाल विहीत वेळेत संचालनालयाकडून शासनास सादर करणे सुलभ होईल.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत-मा.प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर